(सीएनआर नं. एमएचएमएम-१२-०५७३२३-२०१८)

दाखल दिनांक - २७.११.२०१८
नोंदणी दिनांक - २७.११.२०१८
निकाल दिनांक - १४.०२.२०२०
कालावधी - ०१ व, ०२ म, १६ दि

महानगर दंडाधिकारी, २५वे न्यायालय, माझगांव, मुंबई

( पी. आय. मोकाशी यांच्या न्यायालयात )

खटला क. ४९२६९/पीएस/२०१८
निशाणी क.२१

भायखळा पोलीस ठाणे,
मुंबई ...... अभियोगपक्ष

विरूध्द

मयूर अरूण गायकवाड
वयः- २५ वर्षे,
राहण्याचा पत्ताः-२/१०, काच बिल्डींग, डीपीवाडी,
घोडपदेव, मुंबई - ४०० ०३३ ..... आरोपी

आरोपीविरुद्धचा दोषारोप :- भारतीय दंड विधान, १८६० च्या २७९, ३३८ आणि मोटार वाहन कायदा ३ सह १८१ या कलमांतर्गत शिक्षापात्र

अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता :- श्री. शशिकांत ईघारे

आरोपीतर्फे अभियोक्ता :- श्री. दयानंद डेरे

## न्यायनिर्णय

( दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी देण्यात आला)

दिनांक १०/०३/२०१७ रोजी फिर्यादी तिचे घरी असताना रात्रौ ०८:०० वा. चे सुमारास तिचे परिसरात राहणारा इसम नामे श्री. दत्तु याने

तिला घरी येवून 'तुझ्या वडीलांचा अपघात झाला असुन त्यांना उपचाराकरीता के. ई.एम. रूग्णालयात दाखल केले आहे' असे सांगितले. त्यानंतर ती लागलगीच त्याचेबरोबर रूग्णालयात गेली. त्यावेळी रूग्णालयात तिची आई, चुलते नामे भगवान मारूती कांबळे व इतर नातेवाईक हजर होते. त्यावेळी तिचे चुलते नामे भगवान मारूती कांबळे यांनी तिला सांगितले की, त्यांचे सोबत हजर असलेला इसम नामे मयुर अरूण गायकवाड हा त्याचे ताब्यातील मो/सायकल क्र.एमएच ०२ एस एच १६७२ ही घेवून दिनांक १०.०३.२०१७ रोजी सायंकाळी ०६:०० वा. डवरी गल्ली येथून ई.एस.पाटणवाला मार्गाने राणीबागचे दिशेने येत असताना राणीबागचे गेट समोरून तिचे वडील नामे श्री पांडुरंग मारूती कांबळे, हे रस्ता ओलांडत असताना त्याने त्याचे ताब्यातील मो/सायकलने धडक दिली. त्यामुळे त्यांचे उजव्या पायाचे गुडघ्याला मार तसेच डाव्या बाजूला कपाळावर मार लागला असे सांगून सदर मो/सायकल स्वार इसमानेच त्यांस उपचाराकरीता के.ई.एम. रूग्णालयात दाखल केले असे सांगितले. त्यानंतर तिचे वडीलांना डॉक्टरांनी उपचाराकरीता दाखल करून त्यांचा उजच्या पायाचा गुडघा फ्रॅक्चर झाले असल्याचे सांगितले. या कारणावरून आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८ आणि मोटार वाहन कायदा ३ सह १८१ अन्वये अपराध केल्याचा आरोप आहे. तपासामध्ये आरोपींनी वरील गुन्हा केल्याचे आढळून आले.

२) पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रशांत रामहरी मदने यांनी सदर गुन्हयाचा तपास केला आणि तपास पूर्ण झाल्यानंतर या न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दिनांक २७.११.२०१८ रोजी दाखल केले.

३) या न्यायालयाने पाठविलेल्या दखलफर्मानावरुन आरोपी हजर झाला. त्याला सर्व पोलीसकागदपत्रांच्या नकला देण्यात आल्या. वरील गुन्हयाकरिता आरोपीविरुद्ध या न्यायालयाने (निशाणी क्रमांक-२ प्रमाणे) दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा अमान्य केल्यावरुन त्याच्याविरुद्ध पुढे खटला चालविण्यात

आला. आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा आला नसल्याने आरोपीचे फौजदारी प्रकिया कलम ३१३ नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

४) एकंदर अभियोगपक्षाची हकिकत व पुराव्यावरून पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे,

| अ.क. | <u>मुददे</u> | <u>कारणमिमांसा</u> |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करु शकला काय, की, दिनांक १०.०३.२०१७ रोजी ०६.०० वाजताच्या दरम्यान, राणीबाग गेट समोर, ई.एस. पाटणवाला रोड, भायखळा पूर्व, मुंबई येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील मो/सायकल क.एमएच ०१ ऐएफ ५१७८ ही हयगयीने अगर निष्काळजीपणाने, मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालविली ? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिद्ध करु शकला काय, की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वरील कमांकाची मो/सायकल हयगयीने अगर निष्काळजीपणाने चालविली व फिर्यादीचे वडील नामे श्री पांडुरंग मारूती कांबळे, यांस धडक दिली व त्यांना गंभीर दुखापत केली? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिद्ध करु शकला काय, की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मो/सायकल क.एमएच ०१ ऐएफ ५१७८ ही चालक परवाना त्याचे जवळ नसताना चालविली ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात आले. |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुददा कमांक १ ते ३ ला अनुसरून :-</u>

५) आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे फिर्यादी एकता प्रफुल गायकवाड यांची निशाणी १३ प्रमाणे साक्षीदार कमांक १ म्हणून साक्ष नोंदविण्यात आली. फिर्यादीने अभियोगपक्षास मदत केलेली नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की दिनांक १०.०३.२०१७ रोजी तिला हॉस्पीटलमधून फोन आला की तिचे वडीलांचा अपघात झाला आहे. तिचे वडील नामे श्री पांडुरंग मारूती कांबळे, हे रस्ता ओलांडत असताना त्यांना आरोपीच्या ताब्यातील मो/सायकलने धडक दिली. त्यामुळे तिने पोलीस ठाणेस तकार दाखल केली. त्यांनी त्यांच्या जबाबात पुढे असेही सांगितले की त्यांनी आरोपींसोबत तडजोड केली आहे व सदर प्रकरण त्यांना पुढे चालवायचे नाही. म्हणून अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्याची आवश्यकता नसल्याने अभियोगपक्षातर्फे पुरावा बंद करण्यात आला. आरोपी याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल हयगयीने अगर निष्काळजीपणाने, मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालवून फिर्यादीचे वडीलांस धडक दिली व गंभीर दुखापत केली, तसेच आरोपी याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल ही चालक परवाना त्याचे जवळ नसताना चालविली हे सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीने अपराध केल्याचे सिध्द् होण्यासाठी आवश्यक असणारे घटक सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुददा क. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुददा कमांक ४ ला अनुसरून :-</u>

६) मुद्दा क.१ ते ३ मध्ये अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द, आरोपी याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल हयगयीने अगर निष्काळजीपणाने, मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालवून फिर्यादीचे वडीलांना धडक दिली व गंभीर दुखापत केली हे संशयापलीकडे जावून सिध्द केले नाही.

अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८ आणि मोटार वाहन कायदा ३ सह १८१ अन्वये आवश्यक घटक सिध्द केले नाहीत. म्हणून आरोपी हे त्याच्यावर ठेवलेल्या आरोपातून दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

आदेश

१) आरोपी मयूर अरूण गायकवाड, यांस फौजदारी प्रकिया संहिता कलम २५५(१) नुसार भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८ आणि मोटार वाहन कायदा ३ सह १८१ अन्वये अपराध केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचे पूर्वीचे जामीनकदबे आणि बंधपत्र रद्दबातल करण्यात येत आहेत.

३) आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रूपये १५,०००/- चा वैयक्तिक जात मुचुलका व तितक्याच रकमेचा जामीन कदबा दयावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Parvez Isahaquekhan Mokashi
Date: 2020.02.17 16:46:35 +0530

दिनांक :- १४.०२.२०२०

(पी. आय. मोकाशी)
महानगर दंडाधिकारी,
२५ वे न्यायालय, माझगांव, मुंबई